
www.rajdand.com
पुणे, मंगळवार
14.02.2023
पृष्ठ : ४ | मूल्य : ₹ ४.०० | माघ कृ.९
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

स्पाय बलूनवरून अमेरिका-चीन भीडले

पान ४ वर..



# शरद पवारांशी चर्चा करूनच पहाटेचा शपथविधी : देवेंद्र फडणवीसांचा गौप्यस्फोट

## म्हणाले... खातेवाटपही ठरले होते, जुना व्हिडीओ समोर

**मुंबई : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी चर्चा करूनच पहाटेचा शपथविधी झाला होता, असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलाय. त्यांचा तसा जुना व्हिडीओ समोर आला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे उद्यापासून राज्यातल्यात सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होत आहे. तत्पूर्वी हा व्हिडीओ समोर आला आहे.**

भाजपसोबत २०१९ ला सत्तास्थापन करताना अजित पवार यांनी काही आमदारांच्या साथीने सत्ता स्थापन करून राज्यपालांच्या उपस्थितीत विधानभवनात शपथ घेतली. देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाची, तर अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. त्यानंतर आजही या मुद्द्यावरून अजित पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले जात आहे.



फडणवीसांनी गोप्यस्फोट केला की, ''आम्ही निवडून आल्यानंतर आमचे शिवसेनेशी बोलणी सुरू होती. तेव्हा ते काँग्रेस आणि एनसीपीसोबत सत्तास्थापन करण्यासाठी चर्चा करीत असल्याचे समजले. त्यामुळे आम्ही वेगळा पर्याय निवडण्याचे ठरवले. आम्ही काँग्रेससोबत जावू शकत नव्हतो. त्यामुळे राष्ट्रवादीसोबत आम्ही चर्चा केली. त्यावेळीही प्रस्ताव राष्ट्रवादीकडून आला होता.''

जूना व्हिडिओ जो समोर आला त्यात देवेंद्र फडणवीस म्हणतात, ''येथे कॅमेरा नाही तर बोलायला हरकत नाही. आम्ही सरकार बनवण्यासाठीच्या सर्व पूर्तता पूर्ण केल्या. महामंडळ आणि सत्तास्थापन झाल्यानंतर कुणाला कोणती खाती द्यायची हेही आम्ही ठरवले होते सर्व गोष्टी आम्ही फायनल केली. राजकारणात असे होत असते.''

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''राष्ट्रपती राजवट लागली होती, तेव्हा राष्ट्रवादीने जे पत्र दिले होते ते मी लिहीले होते व राष्ट्रवादीमार्फत ते पाठवले होते. सर्व गोष्टी फायनल झाल्या होत्या. शिवसेना आमच्यासोबत चर्चेसाठीही तयार नव्हतीच. त्यावेळी राष्ट्रवादीनेही आम्हाला सांगितले होते की, शिवसेना त्यांच्याशी पहिल्या दिवसांपासून चर्चा करीत आहे.''

याबाबतचा १८ जानेवारी २०२१ चा व्हिडिओ समोर आला आहे.

काही दिवसांपूर्वी पहाटेच्या शपथविधीबद्दल जयंत पाटील म्हणाले होते की, देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांचा ३ वर्षांपूर्वी राजभवनात पहाटेच्यावेळी शपथविधी झाला होता. ही शरद पवारांची खेळी असू शकते. त्यावेळी महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. शपथविधीची ही खेळी ही कुणीतरी जाणिवपूर्वक खेळली असे म्हणता येणार नाही. पण त्यामुळे राज्यात लागू असलेली राष्ट्रपती राजवट मागे घेण्यास मदत झाली. त्या घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस राज्यात आणखी मजबूत झाली.

# पुण्यातील गूगल कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी

## अवघ्या काही तासात तेलंगणातून संशयित ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून मुंबईमध्ये धमकीचं सत्र सुरुच आहे. गर्दीच्या ठिकाणी बॉम्ब ठेवल्याची धमकी अनेकदा देण्यात आली. गुगल इंडियाचं पुण्यातील ऑफिस उडवण्याची धमकी देणारा मुंबईतील बीकेसी कार्यालयात फोन आला होता. त्यानंतर काही तासातच पोलिसांनी धमकी देणाऱ्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. तेलंगणामधून एका आरोपीला अटक करण्यात आली असून तपास सुरु आहे.

मुंबईमध्ये धमकीचे सत्र सुरुच आहे. सोमवारी (१३ फेब्रुवारी) सकाळी पुण्यातील गुगल ऑफिस उडवून देणार अशी धमकी देण्यात आली. मुंबईतील बीकेसी कार्यालयात शिवानंद नावाच्या व्यक्तीकडून धमकीचा फोन आला होता. धमकी देणाऱ्या व्यक्तीने तो हैदराबाद येथे राहत असल्याचे सांगितले. हा फोन लँडलाईनवरुन करण्यात आला होता. पोलिसांनी



या संदर्भातील सर्व माहिती पुणे पोलिसांनी दिली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी गुगलच्या कार्यालयात कोणतीही संशयास्पद वस्तू मिळालेली नाही. तपास सुरु असून अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांची एक टीम तेलंगणाला रवाना झाली आहे. धमकी देण्यामागे काय कारण होते? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी आरोपीविरोधात भादंवि कलम ५०५ (१) (ब) आणि ५०६ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्फोटाने उडवून देणार, अशी धमकी देण्यात आली होती. इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेच्या नावाने ही धमकी देण्यात आली होती. या धमकीमुळे विमानतळ आणि मुंबई पोलिसांची सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाली.

# जनसेवेसाठी स्वत:ला झोकून देणाऱ्यांचाच इतिहास घडतो - प.पू.अशोक कोऱ्हाळेजी

## सहकार महर्षींच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित सत्संग सोहळ्यास हजारोंची उपस्थिती



**अकलूज : प्रतिनिधी**

जनसेवेसाठी स्वत:ला झोकून देणऱ्या माणसांचाच इतिहास घडतो, सहकार महर्षींनी जनकल्याणाचा वसा जोपासला म्हणूनच त्याचे नाव अजरामर झाले. डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील हे जनसेवा संघटनेच्या माध्यमातून आपल्या पूर्वजांचा वारसा पुढे घेऊन जात आसल्याचे वक्तव्य प.पू. अशोक कोऱ्हाळेजी यांनी केले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त अकलूज येथील विजय चौकात पुण्यतिथी समिती व महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या वतीने निरंकारी सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी निरंकारी मिशनचे ज्ञानप्रचारक प.पु. अशोक को-हाळेजी यांनी मुख्य विचारपीठावरुन बोलताना सहकार महर्षींच्या कार्याला उजाळा दिला. याप्रसंगी आहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पदमजादेवी मोहिते-पाटील, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, चेरब्स स्कुलच्या चेअरमन सौ.उर्वशीराजे मोहिते-पाटील, माणिकराव मिसाळ, शिवाजीराव इंगवले देशमुख, आण्णासाहेब इनामदार, आण्णासाहेब शिंदे, सतिश पालकर, राजाभाऊ गुळवे, रणजीतसिंह देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प.पु. अशोक को-हाळेजी म्हणाले की,मिळालेला मनुष्य जन्म सार्थकी लावायचा असेल तर मानवतेची सेवा करुन सत्कार्य करावे,निरंकारी मिशनच्या माध्यमातून सद्गुरु सुदीक्षाजी महाराज या ब्रम्हज्ञानाद्वारे इश्वरी साक्षात्कार करुन देतात. सकलाचा परमपिता एकच ईश्वर आसून तो प्रत्येक प्राणीमात्रात आत्मरुपाने आहे.प्रेम,नम्रता व सहनशिलता या मानवी गुणांना धारण करुन सकलांवर प्रेम करत राहवे असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमासाठी सोलापूर,सातारा,पुणे जिल्ह्यातील हाजारो निरंकारी अनुयायी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गायकवाड सर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवादल युनिट ८२५ चे सेवदल यांचेसह विनायक माने, दिलीप कांबळे, सुधीर रास्ते, मयुर माने,दिपक सुत्रावे, राहुल जाधव,दिलीप सकट, श्रीमंत लांडगे, यांनी परिश्रम घेतले.

# भाजपच्या उमेदवार अश्विनी जगताप यांच्यासाठी महिला मतदारांचा एल्गार

## एक लाखांचे मताधिक्य देण्याचे वचन

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी सोमवारी काळेवाडी परिसरात मतदारांशी संवाद साधला. काळेवाडीच्या विविध भागात कोपरा सभा घेतल्या. त्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिलांनी अश्विनी जगताप यांचा एक लाखांहून अधिक मताधिक्याने विजय करण्याचा निर्धार व्यक्त केला.

भाजपच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप या नागरिकांशी घरोघरी जाऊन संपर्क साधत आहेत. विशेषतः त्या जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे मतदारसंघात अश्विनी जगताप आणि महिला मतदारांमध्ये जिव्हाळ्याचे नाते तयार झाले आहे. अश्विनी जगताप पतीच्या निधनाचे दु:ख बाजूला ठेवून करत असलेल्या प्रचारामुळे महिला मतदारांमध्ये त्यांच्याविषयी प्रचंड सहानुभूती निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्या जेथे जातील तेथे त्यांना महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.

सोमवारी अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी काळेवाडी भागात नागरिकांशी संवाद साधला. विविध भागात कोपरा सभा घेऊन



निवडणुकीत विजयी करण्याचे महिला मतदारांना भावनिक आवाहन केले. महिलांनीही अश्विनीताई तुम्हाला आम्ही एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करू, असे वचन दिले.

यावेळी माजी उपमहापौर नानी घुले, माजी नगरसेविका नीता पाडाळे, माजी नगरसेवक प्रमोद ताम्हणकर, पुणे नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, माजी स्वीकृत सदस्य विनोद तापकीर, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ तापकीर, कैलास सानप यांच्यासह भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोरेगाव शहरात भटक्या कुत्र्यांचा लहान मुलावर हल्ला

## आईने प्रसंगावधन राखत मुलाला वाचविले; नगरपंचायतीने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव शहर व परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून मोठ्यांपासून लहानांपर्यंत अनेकजण कुत्र्यांच्या हल्ल्यात सातत्याने जायबंदी होत आहेत. बाजापेठेसह वेताळ गल्ली टेक परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत आहे. कचराकुंड्या, उकिरडा, मटण व चिकन मार्केट, बाजार पटांगण, जनावरांचा दवाखाना आदी सार्वजनिक ठिकाणांचा भटक्या कुत्र्यांनी ताबा घेतल्याचे दिसून येते. या कुत्र्यांमुळे नागरिक आणि विद्यार्थी कमालीचे त्रस्त झाले आहेत. वेताळ गल्ली टेक परिसरात तीन वर्षांचा मुलगा अंगणात खेळत होता, त्याचवेळी भटक्या पाच ते सहा कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला केला. मुलाच्या ओरडण्याचा आवाज ऐकूण त्याची आई घराबाहेर आली. भटकी कुत्री मुलावर अक्षरशः तुटुन पडलेली होती, ती या ओढून नेत असल्याचे पाहिले. आईने क्षणाचाही विलंब न करता धावत जावून मुलाला कुत्र्यांच्या तोंडातून काढून घेतले. या मुलाच्या अंगावर कुत्र्यांनी ओरखडण्याची निशाण आहेत.

नगरपंचायत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून देखील या कुत्र्यांचा बंदोबस्त होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या भटक्या कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त न केल्यास ही भटकी कुत्रे नगरपंचायत मुख्यालयात सोडून आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

नगरपंचायत कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या वेताळ गल्ली टेक परिसरात मोकाट कुत्र्यांनी हौदोस मांडला आहे. रस्त्याने जाणाऱ्या लहान मुलांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना ताज्या असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शाळकरी विद्यार्थ्यांचा हे भटके कुत्रे पाठलाग करतात. यामुळे भीतीने शाळेत जाण्यास मुले टाळाटाळ करत असल्याची पालकांची तक्रार आहे. रात्री रस्त्याने ये-जा करणे कठीण झाले असून चालतच नव्हे, तर दुचाकीवरून जाणाऱ्या वाहनचालकांचा हे कुत्रे पाठलाग करतात. यामुळे तातडीने या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी अनेकदा नगरपंचायत प्रशासनाकडे करण्यात आली, मात्र दुर्लक्ष केले जात आहे. या भटक्या कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त न केल्यास हे कुत्रे पकडून नगर पंचायत मुख्यालयात आणून सोडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# मुंबई विजयाचे सर्व ‘रेकॉर्ड ब्रेक’ करेल – भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विश्वव्यापी नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांचे रथाचे सारथ्य आणि आमदार आशिष शेलार यांच्यासारखा अर्जुन आपल्याकडे आहे त्यामुळे लोकसभा, विधानसभा आणि मुंबई महापालिका निवडणुकीत यावेळी भाजप आजपर्यंतचे सर्व रेकॉर्ड ब्रेक करुन विजयी होईल असा विश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

मुंबई भाजपच्या कार्यकारिणीची बैठक आज दादर येथील वसंत स्मृती सभागृहात पार पडली. या बैठकीला सकाळच्या पहिल्या सत्रात भाजपाचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांनी मार्गदर्शन केले. आमदार अतुल भातखळकर यांनी राजकीय प्रस्ताव मांडला. त्याला आमदार अमीत साटम यांनी अनुमोदन दिले. मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही मार्गदर्शन केले. या बैठकीला खासदार गोपाळ शेट्टी, पुनम महाजन, मनोज कोटक यांच्यासह सर्व आमदार आणि मुंबई पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीचा समारोप भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाने झाला. यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत एकमेव मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असे होते की त्यांच्या खिशाला पेन नाही. त्यांनी कधी कुठल्या पत्रावर शेरा मारला नाही आणि म्हणूनच त्यांना कंटाळून त्यांचे ४० आमदार गेले. उद्धव ठाकरे यांनी पत्रावर मारलेला शेरा दाखवा व एक हजार रुपये मिळवा असा उपरोधिक टोला प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी लगावला. देवेंद्र फडणवीस हे असे नेतृत्व आहे की, प्रत्येक पत्रावर आदेश लिहून प्रशासनाला निर्देश देत राहतात. जनतेसाठी अहोरात्र मेहनत करणारे नेतृत्व आपल्याकडे आहे. महाराष्ट्राच्या कानाकोप-यात हजारो जन आज भाजपमध्ये येण्यास तयार आहेत. आपली वाट पाहत आहेत. मोठे पक्ष प्रवेश आम्ही करु. पण प्रत्येक बुथवर किमान २५ पक्ष प्रवेश कार्यकर्त्यांनी करा. विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या किंचित सेनेचे पदाधिकारी तर त्यांना एवढे कंटाळले आहेत की ते आपली वाट पाहत आहेत. त्यामुळे कामाला लागा. असे आदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिले. प्रत्येक पदाधिका-यांनी २००० घरी प्रवास करणे अपेक्षित असून ५०० घरी धन्यवाद मोदी, ५०० घरांमध्ये फ्रेंडस ऑफ बीजेपी, ५०० युवा वॉरियर्स अशा स्वरुपात कामाला लागायचे आहे.



येणारा काळ हा आपला आहे. वातावरण उत्तम, सक्षम नेतृत्व, निर्णय घेणारे केंद्रात आणि राज्यात सरकार यामुळे ‘अभी नही तो कभी नही’ असेही त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.

**एक अकेला मुंबईमध्ये सगळ्यांना भारी पडणार - आ.ॲड.आशिष शेलार**

हिंदुस्तान देख रहा है एक अकेला सबको भारी पड रहा है राज्यसभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही बाब अधोरेखित केली त्याचप्रमाणे मुंबईमध्ये सुद्धा एक मोदी सगळ्यांना भारी पडेल असा विश्वास व्यक्त करीत मुंबई भाजपा अध्यक्ष आ.ॲड.आशिष शेलार यांनी भाजपा कार्यकर्त्यांना समजदारी, सहनशक्ती आणि सेवाकार्य वाढवा असे निर्देश दिले.

शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी, काँग्रेस, वंचित, किंचित, माकपा, सपा हे सगळे केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भितीने एकत्र आले असून भाजपा सोबत होते तेव्हा सन्माननीय नेतृत्व शिवसेनेसोबत होते, मतदार होते आणि आमदार ही होते. भाजपाशी गद्दारी केल्यापासून ना त्यांच्याकडे नेतृत्व आहे, ना मतदार आहेत, ना आमदार आहेत. आज मतांसाठी दारोदारी कटोरा घेऊन फिरावे लागते आहे. आपण जनतेच्या सेवेत असून मुंबईकर हे पाहत आहेत. देशाचे गृहमंत्री अमितभाई शाह मुंबईत आले त्यावेळी बाळासाहेबांची शिवसेनेसह एनडीए चे १५० नगरसेवक मुंबई महापालिकेत विजयी होतील आणि भाजपाचाच महापौर होईल. हा जो संकल्प सोडला आहे तो आपल्याला सर्वांना पूर्ण करायचा आहे. त्या दृष्टीने आपल्याला कामाला लागायचे आहे असे कार्यकर्त्यांना आवाहन करताना आमदार आशिष शेलार यांनी गेल्या २५ वर्षात मुंबई महापालिकेत सत्तेत असलेल्या शिवसेनेने पूर्ण केलेले एक काम दाखवा असे सांगत जोरदार हल्लाबोल केला.

गुजरातच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते की, हा विजय आपल्या विरोधकांना पचणार नाही. अन्याय वाढतील त्यामध्ये पक्षाचे नेतृत्वही असेल व कार्यकर्ताही. याला एकच उत्तर आहे. समजदारी, सहनशक्ती आणि सेवाकार्य आपण करत राहायचे आहे. हाच संदेश घेऊन मुंबईमध्ये आपण सर्वांनी काम करु या. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे कणखर नेतृत्व आपल्याकडे आहे त्यामुळे आपण जोमाने कामाला लागु. असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

**दिपा पाटील यांचा पक्ष प्रवेश**

वॉर्ड क्र. १ दहिसर येथील शिवसेना (उबाठा) महिला उपविभाग अध्यक्ष यांच्यासह शाखाप्रमुख गणेश पाटील व त्यांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने आज भाजपामध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

# कुठे नेऊन ठेवले आपल्या कसब्याला? : रवींद्र धंगेकर यांचा सवाल

**पुणे : प्रतिनिधी**

शहराच्या मध्यभागी असणारा आपला कसबा विधानसभा मतदारसंघ आता सर्वप्रकारच्या नागरी प्रश्नांचे आगर बनला असून, त्यामुळेच भाजपाला विचारावेसे वाटते की कुठे नेऊन ठेवले आपल्या कसब्याला? केंद्रात, राज्यात व पुण्यातही भाजपा सत्तेवर असतानाही कसब्याचे प्रश्न का सोडविले नाहीत? अरुंद रस्ते व वाहतूक कोंडी, कमी दाबाने पाणीपुरवठा, पार्किंग, जुन्या वाड्यांचे प्रश्न, मध्यवर्ती बाजारपेठेचे प्रश्न, भाजीमंडई व मिनिमार्केटचे प्रश्न असे असंख्य प्रश्न असतानाही आणि आमदार व सर्वाधिक नगरसेवक भाजपाचे असतानाही त्यांच्या निष्क्रीयतेमुळेच कसबा मतदारसंघातील नागरिकांना मनस्ताप सोसावा लागत आहे. महाविकास आघाडीतर्फे मात्र हे प्रश्न सोडविणे हाच माझा अजेंडा असेल, असे महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी सांगितले, पदयात्रा संपल्यानंतर ते बोलत होते. आज सोमवार दि.१३ फेब्रुवारी रोजी नारायण पेठेतील मुरलीधर भोजनालय येथून पदयात्रेस सुरुवात झाली. काँग्रेसचे गोपाळ तिवारी यांनी सर्वांचे स्वागत केले आणि फटाक्यांच्या आतषबाजीत पदयात्रेस सुरुवात झाली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मित्रपक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रारंभी गोपाळ तिवारी यांनी पुणेरी पगडी, शाल व श्रीफळ देऊन धंगेकर यांचा सत्कार केला. यावेळी ब्राम्हण समाजाचे अनेक स्त्री- पुरुष सहभागी होते. तिन्ही पक्षाचे झेंडे, धंगेकरांचे कटआउट्स यासह पदयात्रा निघाली. पदयात्रेच्या प्रारंभी धंगेकरांच्या पदयात्रेची माहिती सांगणारी






रिक्षा व पाठोपाठ शेकडो कार्यकर्ते अशी ही पदयात्रा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. वाहतूककोंडी होऊ नये, यासाठी कसोशीने प्रयत्न केले जात होते. या पदयात्रेत काँग्रेस पक्षाचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर, कमलताई व्यवहारे, दीप्ती चवधरी, लता राजगुरू, वैशाली मराठे, नीता परदेशी, संगीता तिवारी, अंजली सोलापुरे, गौरव बोऱ्हाडे, साहिल राऊत, ऋषिकेश मिरकर, नाना करपे ,राष्ट्रवादी काँग्रेसचे गणेश नलावडे, रोहन पायगुडे, अजिंक्य पाटकर, स्वप्नील थोरवे, संजय मते, राहुल पायगुडे, अरुण गवळे, संतोष बनकर, दीपक पोकळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल येनपुरे, परेश खांडके, धनंजय देशमुख, संदीप गायकवाड, निरंजन दाभेकर, नितीन परदेशी, राजेंद्र शिंदे, सतीश वाघमारे आदी प्रमुख कार्यकर्ते सहभागी झाले होते. नारायण पेठ व शनिवार पेठ येथून सर्व प्रमुख रस्त्यांवरून जाताना अनेक स्थानिक नागरिक स्वतःहून पुढे येऊन धंगेकरांशी हस्तांदोलन करत होते. 'यावेळी बदल निश्चित करणार' असे सांगत ते धंगेकरांना पाठींबा देत होते.

नारायण पेठेतील कबीर बागेत घरोघरी जाऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. मुठेश्वर मंडळाने त्यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी श्री गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त स्वानंदी भजनी मंडळाच्या भगिनींनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी मंडळाचे गणेश भोकरे यांनी 'धंगेकर हे सर्वसामान्यांचे कार्यकर्ते आहेत आणि विकासाची त्यांना दृष्टी व धमक आहे' असे सांगितले.

पुढे आनंद तरुण मंडळाचे स्वप्नील थोरवे यांनी शिंदेशाही पगडी, शाल व श्रीफळ देऊन धंगेकरांचा सत्कार केला. तेव्हा उपस्थित सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यानंतर हसबनीस बखळ सार्वजनिक मंडळातर्फे धंगेकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. त्यानंतर भारत मित्र मंडळातर्फे फटाक्यांच्या आतषबाजी करून जंगी स्वागत झाले. त्यावेळी बाळासाहेब दाभेकर यांनी त्यांचा भव्य सत्कार करून ते या पदयात्रेत सहभागी झाले. सदाशिव पेठ नवरात्र महोत्सवतर्फे त्यांना फेटा बांधून त्यांचा सत्कार एकला गेला. चौकाचौकात त्यांचे जोरदार स्वागत होत होते. नागरिक स्वतःहून पदयात्रेत सहभागी होत होते. अखेरीस चार तासानंतर ही पदयात्रा खजिना विहिर येथे संपली पदयात्रेचा हाच जोरकस अनुभव पुणेकरांनी कालही अनुभवला.

रविवार दि.१२ फेब्रुवारी संध्याकाळी ४:०० वाजता प्रभाग क्र.१८ मधील श्रीनाथ मंडळ खडकमाळ आळी येथून या पदयात्रेस प्रारंभ झाला. तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांचा प्रचंड उत्साह दिसून येत होता. लाउड स्पीकरवरील घोषणा त्यात भर घालत होत्या. तिन्ही पक्षांचे झेंडे धंगेकर यांचे बॅनर्स व पोस्टर्स यामुळे वातावरण निवडणूकमय झाले होते. या पदयात्रेत काँग्रेसचे कमलताई व्यवहारे, संजय बालगुडे, विनय ढेरे, आयुब पठाण, उमेश काची, हेरॉल्ड मॅसी, अश्फाक शेख, हेमंत राजभोज, राष्ट्रवादीच्या खासदार वंदना चव्हाण, हेमंत येवलेकर, हर्शल भोसले, गणेश माकम, गणेश नलावडे, शिल्पा भोसले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे चंदन साळुंखे, संदीप गायकवाड, रुपेश पवार, अनिकेत थोरात, सागर गंजकर, पंकज भरीदे, मनोज परदेशी, संतोष गायकवाड, चंद्रकांत रणदिवे, अनिल खेंगडे, नितीन दलभंजन आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. या पदयात्रेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार ॲड. वंदना चव्हाण सहभागी झाल्यानंतर कार्यकर्त्यांना अधिकच जोश आला. 'धंगेकर झिंदाबाद'च्या घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला. पदयात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी सर्व पाणी दिले जात होते. रस्त्याच्या दुतर्फा नागरिक गर्दी करत होते. यावेळी वाटली जाणारी पत्रके घेण्यासाठी गर्दी उसळत होती. मामलेदार कचेरीची मागील बाजू, पांगघंटी चौक, धनगर आळी मार्गे वालवार आळी येथे पदयात्रेची सांगता झाली. त्यावेळी धंगेकरांच्या झिंदाबाद च्या घोषणांनी सारा परिसर दणाणून गेला होता.

## नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध; पत्नीची आत्महत्या

**पुणे :** नवऱ्याच्या विवाहबाह्य संबंधांना कंटाळून विवाहितेनं आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. पुण्यातील हडपसर भागात ही घटना घडली आहे. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध होते. त्यामुळे रोज मानसिक आणि शारीरिक छळ व्हायचा. या छळाला कंटाळून विवाहितेने टोकाचं पाऊल उचललं आहे. राहत्या घरातच महिलेने गळफास लावून घेतला आहे. या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती आनंद बधे, रंजना बधे, कल्याण बधे (सर्व रा. संकेत विहार, फुरसुंगी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. हर्षदा आनंद बधे असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे.

# फ्यूज नाही, केबल नाही, डीपीही नाही अन् वायरमनला वेळही नाही.. मग पैसे भरायचे कशासाठी?

## शेतकऱ्यांचा महावितरणच्या अधिकाऱ्यांना सवाल

**अकलूज : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना कोणतीही पुर्वसुचना न देता तुम्ही बीज तोडणी करता. शेतकऱ्यांचे किती नुकसान होतेय याचा विचार करत नाही. मार्च महिना जवळ आला की तुम्हाला वसुलीची आठवण येते, पण वर्षभर आम्हाला वेळेवर फ्यूज, केबल, ऑईल, डीपी मिळत नाही. मिळाला तर जोडायला वायरमनला वेळ नसतो. ऑईल बाजारातून विकत घ्यावे लागते. डीपी नेण्यासाठी स्वतः गाडी न्यावी लागते. एक बल्प बदलायचा म्हटले तर वायरमन २०० रूपये मागतो त्यावेळी तुम्ही कुठे असता असा खड़ा सवाल आज बैठकीमध्ये शेतकऱ्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारला.

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. राम सातपुते व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आज शिवरत्न बंगला अकलूज येथे माळशिरस तालुक्यातील शेतकरी व महावितरणच्या अधिकाऱ्यांची वीज तोडणी व बिल भरणा याविषयी बैठक घेण्यात आली. यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता संजय गायकवाड, उपकार्यकारी अभियंता दत्तात्रय ओमासे, प्रविण कुंभार, किरण डोईपोडे, अकलूज विभागाचे उप व्यवस्थापक प्रदीप सुरवसे, माळशिरस तालुक्याच्या विविध भागांतून आलेले शेतकरी उपस्थित होते.

यावेळी आ. मोहिते-पाटील म्हणाले, वीज बिल भरण्यासंदर्भात माळशिरस तालुक्याला वेगळा आणि आजु बाजुच्या तालुक्यांना वेगळा असा नियम महावितरणने लावू नये. त्याचबरोबर शेतकऱ्यांना पुर्वसुचना न देता त्यांची शेतीपंपाची विज तोडणी करू नका. जे शेतकरी वारंवार



सांगुनही पैसे भरत नसतील तर त्यांची विज तोडा पण पैसे भरणाऱ्यांचे नुकसान होऊ देवू नका असे अधिकाऱ्यांना सांगितले.

आ. सातपुते म्हणाले, तालुक्यातील विरोधकांना शेतकऱ्यांची काळजी नाही. एकही विरोधक नेता शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नावर रस्त्यावर उतरलेला दिसला नाही. परंतु आमच्यावर टिका करायला मात्र सगळे मोकळे आहेत. महावितरणच्या कारभाराला कोणतेही लॉजीक नाही. निव्वळ ठोकताळ्यांवर चाललेली ही संस्था आहे. पैसे न भरणाऱ्यांबरोबरच पैसे भरणाऱ्यांचेही कनेक्शन हे लोक बिनदिक्कतपणे बंद करतात. आकडेवाल्यांवर कंट्रोल ठेवा. त्यांच्यामुळे पैसे भरणाऱ्यांचे नुकसान होता कामा नये.

यावेळी आ. मोहिते-पाटील व आ. सातपुते यांनी अधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेतुन शेतकऱ्यांनी प्रत्येकी ५ हजार रूपये बिल भरावयाचे ठरले. यावर एकवाक्यता झाल्यावर बैठक संपली.

### अहो आश्चर्यम... ३ एचपीची मोटार खेचते ५ एचपीचा करंट

**पत्रकारांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली त्यावेळी अधिकारी म्हणाले, अनेक शेतकरी ३ एचपीचे कोटेशन भरतात व ५ एचपीची मोटार वापरतात. किंवा सध्या बाजारात अशा मोटारी आहेत की, ज्यांचे लेबल ३ एचपीचे आहे व त्या करंट मात्र ५ एचपीचा खेचतात. हे आम्ही ॲम्पीअर चेक करून प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या एचपीमध्ये वाढ करून बिले दिली जातात. अशाप्रकारे भलताच वाढीव एचपी देणा-या मोटारी खरेदीसाठी माळशिरस तालुक्यातील शेतकरी टेंभुर्णी, इंदापूर, नगर, सांगोल्याकडे धाव घेत आहेत. आयएसआय मार्क वापरुन अशा फसव्या मोटारी बनवणा-या व विकणा-यांवर कडक कारवाई होणे गरजेचे झाले आहे.**

**माळशिरस तालुक्यात एकूण ६५ हजार घरगुती व व्यापारी वीज कनेक्शन आहेत. त्यापैकी २० हजार ३१२ घरगुती कनेक्शन धारकांकडे १ कोटी ८६ लाख रूपये, २ हजार ६७ व्यापाऱ्यांकडे ५५ लाख ८५ हजार रूपये, १ हजार ७०० औद्योगिक कनेक्शन पैकी ३६४ कनेक्शन धारकांकडे ३६ लाख ९ हजार रूपये थकबाकी आहे. तर ४८ हजार ५६४ कृषी पंप कनेक्शन धारकांकडे सन २०१३-१४ पासून सन २०२० अखेर ७४७ कोटी ८३ लाख रूपये थकबाकी व त्यावर ८७ कोटी २९ लाख रुपये व्याज व दंड येणे बाकी आहे. या ७४७ कोटी ८३ लाख रूपयांपैकी येत्या मार्च अखेर पक्त ३० कोटी रूपये वसुल करण्याचे महावितरणला उद्दीष्ट देण्यात आले आहे. कृषी पंप विज धोरण २०२० अंतर्गत महावितरणने या वर्षी ३४ कोटी ३६ लाख रूपयांची वसुली केली आहे. तर ज्यांनी विज बिल दुरुस्ती (एचपी कमी करून देणे) साठी अर्ज केले होते अशा शेतकऱ्यांची ७६ लाख रूपयांची विज बिल दुरुस्ती करून दिली आहे. महावितरणकडे विज गळतीचे प्रमाण २४.२१ टक्के इतके आहे. माळशिरस तालुक्यात सध्या ३७ कोटी रूपयांची विज दुरूस्तीची कामे सुरू आहेत.**

# सातारा जिल्ह्यातील ५१ सहकारी संस्थाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर - मनोहर माळी

**मेढा : प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील ब प्रकारातील सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम, संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन २०२३ ते २०२८ महाराष्ट्र सहकारी संस्था समिती निवडणूक नियम २०१४ चा नियम १९ अन्वयम प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या व अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केले ल्या सहकारी संस्थांच्या निवडणुकी करता संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केलेले खालील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूक सन २०२३ ते २०२८ च्या निवडणुकीतील कार्यक्रमाचे विविध टप्पे खालील प्रमाणे जाहीर करण्यात आले आहेत.

निवडणूक जाहीर झालेल्या संस्थांसाठी नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती १३ /०२ /२०२३ पासून ते १७ /२ /२०२३ अखेर राहणार असून दाखल झालेल्या अर्जांची छाननी २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. त्यानंतर नामनिर्देशन पत्र माघार घेण्याची मुदत २१ फेब्रुवारी ते ८ मार्च २०२३ अखेर राहणार आहे. यापैकी निवडणूक लागल्यास सदर संस्थांसाठी १८ व १९ मार्च रोजी मतदान होणार असून मतदान प्रक्रियेनंतर त्याच दिवशी निकाल जाहीर करण्यात येणार आहे. यामध्ये फलटण, वडूज, सातारा, दहिवडी, माण व वाई या तालुक्यातील सहकारी संस्थांचा समावेश आहे.

फलटण तालुक्यातील गोखळी विकास सेवा सोसायटी गोखळी, फरांदवाडी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी फरांदवाडी, मठाचीवाडी विकास सोसायटी मठाचीवाडी, भैरवनाथ विकास सोसायटी सासवड, श्रीराम विकास सोसायटी राजुरी, कुरोली विकास सेवा सोसायटी कुरवली, विडणी विकास सोसायटी विडणी, समह पवार विकास सेवा सोसायटी मर्यादित पवारवाडी त्याचप्रमाणे खटाव तालुक्यातील एनकुळ विकास सोसायटी एनकुळ, वेटने विकास सोसायटी वेटणे, सिद्धेश्वर कुरोली विकास सोसायटी सिद्धेश्वर किरोली, हनुमंतराव साळुंखे विकास सोसायटी कलेढोण, खातवळ विकास सोसायटी खातवळ, जय भवानी विकास सोसायटी कलेढोण, पेडगाव




विकास सोसायटी पेडगाव, सातारा तालुक्यातील व वर्णे विकास सोसायटी वर्णे, भैरवनाथ विकास सेवा सोसायटी क्षेत्रमाहुली, वर्णे विकास सोसायटी वर्णे, मर्दे विकास सोसायटी मरडे कुमठे विकास सोसायटी कुमठे, सोनापूर विकास सोसायटी सोनापूर, धावडशी विकास सोसायटी, धावडशी, रानंद विकास सोसायटी रानंद, बोथे विकास सोसायटी बोथे. पाटण तालुक्यातील तारळे विकास सोसायटी तारळे, कोकिसरे विकास सोसायटी कोकीसरे, उरुल विकास सोसायटी उरुल, ढेबेवाडी विकास सोसायटी ढेबेवाडी, वांजोळे विकास सोसायटी वांजोळी, कराटे विकास सोसायटी कराटे खंडाळा तालुक्यातील वडगाव विकास सोसायटी वडगाव यानंतर कराड तालुक्यातील अटके विकास सोसायटी अटके, कारवे विकास सोसायटी कारवे ,कोडोली विकास सोसायटी कोडोली , शेनोली विकास सेवा सोसायटी शेनोली, तुळसण विकास सेवा सोसायटी तुळसण ,कोळेवाडी विकास सोसायटी कोळेवाडी, जिंती विकास सोसायटी जिंती, वारुंज विकास व सोसायटी वारुंजी, जखिन वाडी विकास सोसायटी जखिन वाडी, कराड विकास सोसायटी कराड ,प्रियदर्शनी विकास सेवा सोसायटी कराड, यानंतर कोरेगाव तालुक्यातील विखळे विकास सोसायटी विखळे , तडवळे विकास सोसायटी वाघोली तडवळे, तळीये विकास सोसायटी तळीये, कुमठे विकास सोसायटी कुमठे , वाठारस्टेशन विकास सोसायटी वाठार स्टेशन, रेवडी विकास सोसायटी रेवडी, नागझरी विकास सोसायटी नागझरी, वाघोली विकास सोसायटी वाघोली ,वाई तालुक्यामधील धोम विकास सोसायटी मर्यादित धोम या संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे.

# टोकाची भूमिका न घेता पक्षकारांनी आपापसांत सामंजस्याने वाद मिटवले तर समाधान मिळेल

## न्यायाधीश सु. ना. राजुरकर यांचे प्रतिपादन



**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व राजगुरुनगर बार असोसिएशन यांच्या वतीने राजगुरुनगर व जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीमध्ये पक्षकारांनी सामंज्यसाने व सुसंवादाने तडजोड करून वाद मिटवावे, असे आवाहन राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश सु. ना. राजुरकर यांनी केले. या लोकअदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश राजुरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा व अतिरिक्त न्यायालयाचे सत्र न्यायाधीश ए. एम. अंबाळकर, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश श्रीम. पाखले, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश महेंद्र पाटील, तालुका न्यायाधीश श्रीम. आर. डी. पतंगे- इंगळे, तालुका न्यायाधीश डी. बी. पतंगे, तालुका न्यायाधीश श्रीम. जे. व्ही. म्हस्के, राजगुरुनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नवनाथजी गावडे, माजी अध्यक्ष ॲड. अरुण मुळूक, ॲड. पोपटराव तांबे पाटील, ॲड. माणिकराव पाटोळे, ॲड. देविदास शिंदे पाटील, उपाध्यक्ष ॲड. ललित नवले, सचिव ॲड. गोपाळ शिंदे, ॲड. संदीप दरेकर, ॲड. रेश्मा भोर, ॲड. रश्मी वाघोले, ॲड. अतुल गोरडे, ॲड. नामदेव वाडेकर, ॲड. दत्तात्रय लिंभोरे, ॲड. सुलभा कोटबागी, ॲड. महेश कोहिनकर, ॲड. निलेश चौधरी, ॲड. आरती टाकळकर, ॲड. वैभव कर्वे, ॲड. प्रतिभा होले यांच्यासह वकील, खेड पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक, खेड तालुका गटविकास अधिकारी, पक्षकार उपस्थित होते. युनियन बँकेच्या डी. जी. एम. शारदा मूर्ती, राजगुरूनगर चे न्यायालयीन कर्मचारी व विविध बँकांचे कर्मचारी उपस्थित होते. पॅनल सदस्य म्हणून ॲड. अजय टाकळकर, ॲड. लहू तरडे, ॲड. सोनाली कोकणे, ॲड. आरती सांडभोर यांनी काम पाहिले.

९ कोटी ५२ लाख ६ हजार ९२९ रुपये व २ कोटी ७६ लाख ८३ हजार ८४ रुपयांची वसुली सेटलमेंट तडजोडीने झाली. तडजोडी करीता एकूण २५४३ दिवाणी दावे व खटले ठेवण्यात आलेले होते. त्यापैकी २०३ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली. प्रिलिटिगेशनची १०७७६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३९४६ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजगुरुनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नवनाथ गावडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. अबू बकर पठाण यांनी केले तर आभार ॲड. प्रवीण पडवळ यांनी मानले.

# राष्ट्रवादीचे उत्तम जानकर यांच्या जातीच्या दाखल्याबाबत सर्वोच्च न्यायालयात १७ फेब्रुवारीला सुनावणी

## राष्ट्रवादीचे नेते संकल्प डोळस यांची माहिती

**अकलूज : प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील राष्ट्रवादीचे नेते उत्तमराव जानकर यांच्या हिंदू खाटीक या जातीच्या दाखल्याची सत्यता सुनावणी शुक्रवार १७ फेब्रुवारी २०२३ रोजी मा सर्वोच्च न्यायालयात होणार असल्याची माहिती संकल्प हनुमंतराव डोळस यांनी अकलूज येथे बोलताना दिली. गेल्या अनेक वर्षापासून वेळापूर येथील रहिवाशी असणारे व माळशिरस तालुक्यातील राष्ट्रवादीचे नेते उत्तम जानकर यांनी काढलेल्या हिंदू खाटीक या जातीच्या दाखल्याबाबत अनेक तर्कवितर्क लढविले जात होते. मात्र, पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीमुळे हा जातीचा दाखला चर्चेत आला आहे.

यावेळी माहिती देताना संकल्प डोळस यांनी सांगितले की, सन २००७ साली उत्तम जानकर यांनी प्रांत कार्यालयाकडून बनावट कागदपत्रे सादर करून हिंदू खाटीक जातीचा



दाखला मिळविला व सन २००९ ची विधानसभा निवडणूक लढवली तत्कालीन आ हनुमंत डोळस यांनी सोलापूर जात पडताळणी समिती समोर या दाखल्याच्या विरोधात दाद मागितली व हा दाखला बनावट कागदपत्रे सादर करून मिळविला आहे असा युक्तिवाद केला तो युक्तिवाद ग्राह्य करून सोलापूर येथील जात पडताळणी समितीने हा दाखला रद्द केला यामुळे सन २०१४ च्या विधानसभा निवडणुक अर्ज छाननीत जानकर यांचा उमेदवारी अर्ज बाद झाला यानंतर जानकर यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली व पुन्हा जानकर यांचा दाखला न्यायालयाने ग्राह्य धरला यामुळे जानकर यांना २०१९ ची विधानसभा निवडणूक लढविता आली.

यानंतर दिवंगत आ हनुमंत डोळस यांचे पुत्र संकल्प डोळस यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाच्या विरोधात सुप्रीम कोर्टात स्पेशल लिव पिटीशन दाखल केली सर्वोच्च न्यायालयाने ही स्पेशल लिव पिटीशन दाखल करून घेत उत्तम जानकर यांच्या हिंदू खाटीक या जातीच्या दाखल्याबाबत शुक्रवार दि १७ फेब्रुवारी रोजी पुन्हा सुनावणी ठेवली आहे यामुळे उत्तम जानकर यांच्या हिंदू खाटीक या दाखल्याबाबत काय होणार? याबाबत सर्वत्र चर्चा होत आहेत उत्तम जानकर यांच्या हिंदू खाटीक या दाखल्याबाबत अनुसूचित जाती जमाती बचाव समिती माळशिरस तालुक्याच्या वतीने अकलूजच्या प्रांत कार्यालयावर गुरुवार दि १६ रोजी जन आक्रोश मोर्चाही काढण्यात येणार आहे यामुळे जानकर यांनी सर्वोच्च न्यायालयाने आमचा दाखला ग्राह्य धरला आहे अशी चुकीची माहिती देत न्यायालयाचा अवमान करून जनतेची दिशाभूल करीत आहेत अशीही माहिती यावेळी संकल्प डोळस यांनी दिली .

**उत्तम जानकर यांची मुलगी ज्योती चिताळकर यांनी बोगस जातीच्या दाखल्याच्या आधारे निवडणूक लढवल्याचे उघड झाले आहे. जात पडताळणी समितीने त्यांचा जातीचा दाखला रद्द ठरवला असून, हा दाखला कुठल्याही शासकीय कार्यालयातून देण्यात आलेला नव्हता अशी धक्कादायक माहिती दिली आहे.**

**पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्राला काळिमा फासण्याचे काम माळशिरस तालुक्यात उघडपणे होत आहे.**

**शैक्षणिक, राजकीय, सामाजिक जागा बळकावण्याचा प्रयत्न करत असणाऱ्या प्रवृत्ती अनुसूचित जाती साठी धोकादायक ठरू पहात आहेत.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले सर्वस्व पणाला लावुन जी राज्यघटना निर्माण केली. त्या घटनेतील अनुसुचीत जातीच्या तरतुदींच्या कायद्याची मोडतोड करून दलितांच्या जागेवर सध्या अतिक्रमण करण्यासाठी उत्तम जानकर यांच्यासह माळशिरस तालुक्यातील मंडळी टपुन आहेत.म्हणून आम्ही माळसिरस तालुका अनुसूचित जाती जमाती बचाव समिती स्थापन करुन या घटनेचा निषेध व्यक्त करुन सदर जागेवरील अतिक्रमण थांबवण्यासाठी दि १६/०२/२०२३ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून प्रांत कार्यालय अकलूज असा मोर्चाचे आयोजिन केला आहे. यावेळी आपण संविधान संरक्षणार्थ आपल्या कार्यकर्तेसह उपस्थित राहावे, असे सामाजिक कार्यकर्ते लालासाहेब अडगळे यांनी आवाहन केले आहे.**

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

# म्हसवड पाणी योजनेसाठी ७९ कोटींचा निधी मंजूर - आ.जयकुमार गोरे

## नागरिकांना दररोज मिळणार मुबलक शुद्ध पाणीपुरवठा

**म्हसवड : प्रतिनिधी**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ अभियानाअंतर्गत म्हसवड शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ७९ कोटी ११ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून शहराला पाणीपुरवठा करणारी यंत्रणा कार्यान्वित होऊन नागरिकांना दररोज मुबलक शुद्ध पाणी मिळणार असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार जयकुमार गोरे यांनी सांगितले. पाणीपुरवठा प्रकल्पाला निधी मंजूर झाल्याचे समजताच म्हसवडकरांनी जल्लोष केला.

आमदार गोरे यांनी सदर अभियानाची माहिती देताना सांगितले की महाराष्ट्राच्या १८२३६ कोटींच्या जलकृती आराखड्यास केंद्र शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. या अभियानातून म्हसवड नगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पाला ७९ कोटी ११ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून वर्किंग सर्व्हे, जॅकवेल आणि पंप हाऊस, हेड वर्क आणि सोलरसाठी मीटर रूम, रॉ वॉटर रायझिंग मेन, १२ किलोमीटर लांबीच्या पाइपलाइनचे सक्षमीकरण, पाणी प्रक्रिया प्रकल्प, २ या अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने स्टाफ निवासस्थाने, शुद्ध पाणीपुरवठा पाइपलाइन, एएसआर



दुरुस्ती, वितरण व्यवस्था, अल्ट्रासॉनिक, मीटर्स, संरक्षक भिंती, शुद्ध पंपिंग यंत्रसामग्री, सोलर पॉवर,आवश्यक रस्ते अशी अनेक कामे केली जाणार आहेत.

गत सहा वर्षांपूर्वी पाणी म्हसवडमध्ये आमची सत्ता होती. तेव्हा आम्ही प्रामाणिकपणे शहराचा कामे करुन सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला होता. अनेक मोठी कामे पूर्णही केली होती. मात्र, विरोधकांनी स्थानिक नेतृत्वाचा तकलादू मुद्दा उपस्थित करत नागरिकांना भूलथापा दिल्या. कटकारस्थानाने त्यांच्या ताब्यात सत्ता गेल्यावर गेल्या सहा वर्षांत शहराची अवस्था अत्यंत वाईट झाली. जनतेला दहा ते बारा दिवसांनंतरही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. आम्ही केलेल्या विकासकामांची त्यांना साधी देखभालही करता आली नाही.

म्हसवडच्या जनतेने माझ्यावर सुरुवातीपासूनच मोठा विश्वास दाखवला आहे. त्या विश्वासाला तडा जाऊ न देता मी शहराच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. आमच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जनतेची गरज लक्षात घेऊन मागणी केली. मुख्याध्याकाऱ्यांनी अंदाजपत्रक बनवताच शासनस्तरावर पाठपुरावा आणि प्रयत्न करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ७९ कोटींचा निधी मिळाला आहे, असेही यावेळी आ. गोरे यांनी सांगितले. तर म्हसवडकर जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होत असलेले हाल पाहता शहराला पाणी पुरवठा करणारी योजनीच नव्याने कार्यान्वित करणे गरजेचे असताना केवळ सत्तेचा मलीदा लाटण्यातच धन्यता मानणार्या पालिकेतील सत्ताधार्यांनी याकडे लक्ष न दिल्याने ही योजनास मोडकळीस नेली त्याचा परिणाम शहराच्या पाणी पुरवठ्यावर झाल्यानेच शहराला १० ते १२ दिवसातुन पिण्याचे पाणी मिळु लागले ही परिस्थिती आपण बदलुन शहराला दररोज मुबलक पिण्याचे पाणी देण्याचा शब्द म्हसवडतरांना दिला आहे तो शब्द आज पुर्ण होताना दिसत आहे.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव शिंदे, धनश्रीदेवी राजेमाने, माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा, सुरेश म्हेत्रे, नितीन दोशी, डॉ. वसंतराव मासाळ, धनाजी माने, शिवाजीराव लोखंडे, रवींद्र वीरकर, बबन अबदागिरे, लुनेश विरकर,मारुती जगताप आणि भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

### पालिका इतिहासीतील सर्वात मोठे काम मंजूर, तर आ. गोरे म्हणजे शब्द पाळणारा नेता - माजी नगराध्यक्ष विजय धट

**गेल्या पाच वर्षांत सत्तेत राहिलेल्यांच्या भूलथापांना म्हसवडकर पुरते वैतागले आहेत. शहराच्या विकासाचा बोजा त्यांना सहनच झाला नाही. राज्यात त्यांची सत्ता होती, तरी त्यांना एकही विकासकाम करता आले नाही. पाच वर्षांत जनतेला नरकयातना भोगाव्या लागल्या. आमदार जयकुमार गोरेंनी भाजप युतीची सत्ता 'येताच शहराच्या इतिहासातील सर्वात मोठे काम मंजूर करून आणल्याचे व म्हसवडकर जनतेला दिलेला शब्द पाळल्याचे माजी नगराध्यक्ष विजय धट यांनी सांगितले.**

# ॲड. अभयसिंह कदम यांची पुणे जिल्हा परिषद कायदा विषयक सल्लागार म्हणून नियुक्ती

**फलटण : प्रतिनिधी**



पुणे जिल्हा परिषद कायदा विषयक सल्लागार म्हणून गिरवी, ता. फलटण येथील प्रख्यात विधीतज्ञ ॲड. अभयसिंह कदम यांची नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्तीबद्दल ॲड. कदम यांचे विविध स्तरावरुन अभिनंदन होत आहे.

बारामती, सातारा, पुणे व फलटण येथील कनिष्ठ व जिल्हा न्यायालयात तसेच महसूल न्यायालयातील दिवाणी व फौजदारी खटल्यात गेल्या सुमारे १७ वर्षांपासून कायद्याची बाजू भक्कम पणे मांडून पक्षकाराला न्याय मिळवून देण्यात ॲड. कदम सतत यशस्वी होत असताना ही नवी जबाबदारी त्यांना कामाची नवी संधी उपलब्ध करुन देणारी ठरणार आहे.

ॲड. कदम यांचे चुलते जेष्ठ विधिज्ञ ॲड. मानसिंगराव कदम, निवृत्त जिल्हा न्यायाधीश न्या. बापूराव कदम आणि चुलत बंधू ॲड. संग्रामसिंह कदम, स्व. ॲड. भास्करराव कदम यांचा या क्षेत्रातील समृध्द वारसा ॲड. अभयसिंह कदम हे उत्तम पद्धतीने पुढे चालवीत असल्याने यांचे सतत कौतुक होत असताना ही नवी जबाबदारी त्यांना अधिक नावलौकिक मिळवून देणारी ठरणार आहे.

या नियुक्ती बद्दल त्यांचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर, आ. दीपकराव चव्हाण, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, सह्याद्री भैय्या कदम, फलटण, बारामती, सातारा वकील संघातील सदस्य यांच्या सह अनेकांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# जीवन जगले मैत्रीत, प्राणही सोडला एकत्रित!

## वडगाव येथील वयोवृध्द दोन मित्रांच्या निधनाने परिसरात हळहळ...

**सातारा : प्रतिनिधी**

परळी खोऱ्यातील वडगाव उरमोडी धरणानजीकचं छोटसं गाव. या गावात वास्तव्यास असलेल्या दोन वयोवृध्दांची मैत्री अन् जीव्हाळ्याचे संबंध हे पंचक्रोशीमध्य चर्चीली जात होती. एकमेका सहाय्य करु असा यांचा स्वभाव सर्वांना हवाहवासा वाटणारा होता. मात्र गुरुवारी सकाळी श्रीरंग बांबरस (वय-९३) यांचे निधन झाले ही घटना त्यांचे मित्र विष्णू बांबरस यांना समजताच त्यांनी हि आपले प्राण सोडले.



वृध्दापकाळापर्यंत असणारे ''एक दुजे के लिए'' अशी असलेली मैत्री शेवटच्या श्वासापर्यंत एकत्रीत राहिली.

सविस्तर वृत्त असे की, वडगाव येथील श्रीरंग कोंडीबा बांबरस (वय-९३) व विष्णू कृष्णा बांबरस (वय-९०) हे दोन्ही गृहस्त आपले पारंपारिक शेती उद्योगधंदे एकत्रित रित्या करित होते. हे करत असताना या दोघांची मैत्री घट्ट होती. काही वर्ष श्रीरंग बांबरस हे मुंबईला ही होते. तेथून आल्यावर हे दोघे गावाकडेच असायचे. दोघांचीही शेती अन् बैली जोडी होती. गावात कोणाकडे शेती वजवायची असेल तर हे दोघे विना अट त्यांच्याकडे मशागतीसाठी जात. गावात एखादे शुभकार्य किंवा अन्य काही काम असेल तर हे दोघे हीरीहीरीने भाग घेत. वयानुसार शेतीची कामे बंद केल्यावर हे वडगाव गावच्या चौकातच गप्पा मारत बसत. अशी त्यांची निखळ मैत्री होती. पत्र गेली आठ पंधरा दिवस त्यांच्या तब्येतीमध्ये चढ-उतार होत होता. मात्र गुरुवारी सकाळी श्रीरंग बांबरस यांचे वृध्दापकाळाने निधन झाले ही घटना विष्णू बांबरस यांना समजताच ते अगदी शांत झाले होते. जणू त्यांच्या डोळ्यासमोर सगळा जीवनपटच उभा राहिल्यासारखाच त्यांचा चेहरा झाला होता. त्यांनंतर काही तासातच विष्णू बांबरस यांनी ही आपले प्राण सोडले. या दोन्ही घटनेने परळी परिसरात हळहळ व्यक्त होत होती. कुटुंबियांनी व ग्रामस्थांनी त्यांच्या मैत्रीमुळे त्या दोघांनाही एकाच ठिकाणी अग्नी दिला. दोघांचा प्रवास म्हणजे ''जीवन जगले मैत्रीत अन् प्राण सोडले एकत्रित ''असाचं काहीस म्हणावं लागेल. एकाच दिवशी दोन दुःखद घटना झाल्यामुळे कुटुंबीयांबरोबरच वडगाववरही शोककळा पसरली आहे.

# मराठा नागरी सहकारी पतसंस्थेमार्फत चारचाकीचे वितरण



**लोणंद : प्रतिनिधी**

लोणंद पंचकोशीतील नामांकित असलेली मराठा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित लोणंद या पतसंस्थेचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. अनिलराजे अनंतराव निंबाळकर यांचे हस्ते खातेदारांना सुलभ व त्वरीत वाहन तारण कर्जाच्या अनुषंगाने व्हॉयनिक मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि, लोणंद या कंपनीस चार चाकी वाहनाचे वितरण करण्यात आले. त्यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. हणमंतराव पांडुरंग यादव, संस्थेचे संचालक श्री. संजय तुकाराम मोकाशी, श्री. विजयकुमार बाजीराव जाधव, श्री. चंद्रकांत आनंदराव जगताप, श्री. महेंद्र नामदेवराव यादव, डॉ. श्री. किशोर नारायणराव शिंदे, श्री. राजेश धोंडिंबा शिंदे, सौ. प्रतिभा अनिलराजे निंबाळकर, सौ. मंदाकिनी लक्ष्मण शिंदे, डॉ. श्री. दयाराम शंकर सुर्यवंशी, डॉ. श्री. मिलींद दामोदर काकडे, श्री. मोहन वाळू जवळे तज्ञ संचालक डॉ. श्री. गणेश विलास दाणी, श्री. गिरीष दयाशंकर रावळ तसेच संस्थेच्या सचिव सौ. मनिषा भोसले व सहसचिव सौ. विजयश्री माळदकर उपस्थित होते.

संस्थेची सांपत्तिक स्थिती ११ कोटीच्या ठेवी, ७ कोटीचे कर्ज वाटप, ५ कोटीची गुंतवणुक आहे. ठेवीसाठी ८% झालेला असुन ज्येष्ठ नागरिकांना अर्धा टक्का व्याज दर ज्यादा देत आहोत. तसेच खातेदारासाठी मासिक व्याज ठेव योजना, आवर्त ठेव योजना, जिजाऊ ठेव योजना उपलब्ध आहेत.

संस्थेने खातेदारांना सोने तारण कर्ज ९% व्याजदराने त्वरीत उपलब्ध होत आहे. सभासद जामीनकी कर्ज १५% व्याजदर व तारणी कर्जासाठी १३ % व्याजदर असुन त्वरित वाहन तारण कर्ज उपलब्ध आहे, सभासदांना लॉकर सुविधा, आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी., विज बिल भरणा केंद्र तसेच खातेदारांच्या सेव्हिंग्ज खात्याचा ट्ठ उजृए द्वारे व्यवसायीक खातेदारांना त्यांच्या ग्राहकांसाठी कॅशलेस सेवा देत आहोत तसेच Google pay, paytm, BHIM, UPI, PhonePay या मोबाईल ॲप द्वारे त्वरीत व्यवहार होत आहेत अशा अनेक सुविधा खातेदारांना उपलब्ध करून देत आहोत.

# सध्या सर्वांना चिंता देवाच्या अस्तित्वाची : डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर

## महाशिवरात्री संगीत व नृत्य महोत्सवात १३ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर येथील नर्तन स्कूल ऑफ डान्सच्या गुरू कविता नायर आणि सहकार्यांचा भरतनाट्यम नृत्य कार्यक्रम...

**सातारा : प्रतिनिधी**

प्रत्येक मनुष्याला आपलं चांगलं जीवन जगण्यासाठी देवाची कृपा अत्यंत आवश्यक आहे. देवाची ओळख अनुभवता येण्यासाठी उपासनेचा मार्ग हा योग्य मार्ग आहे. सध्या मनुष्याला सर्वात जास्त चिंता आहे की देवाच्या अस्तित्वाची .कारण कितीही चिंता आणि चर्चा केली ती व्यर्थ आहे .यासाठी अनुभवातूनच फळ जे कृपेचे शास्त्र अनुभवात मिळवता येईल . आपल्याला आपले कुलदैवत ,आपली परंपरा माहित नाही .आपण पूर्णपणे यासाठी अनभिज्ञ आहोत. नव्या पिढीला त्यांचे गोत्र ,कुलदेवता ही माहित नाही. आपल्या परंपरेला आपण जाणून घ्या, कारण ओळखी शिवाय ज्ञान नाही, आणि अभ्यास हे आजच्या काळाचे शास्त्र आहे. वेदांनी शास्त्र समजून घेते आम्हाला सांगितले वेळेचे भान आणि काळाचे ज्ञान हा मंत्र पूर्णवादाने दिला आहे, असे उद्गार ज्येष्ठ निरुपणकार डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर यांनी काढले.



श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिर महाशिवरात्री संगीत व नृत्य महोत्सवात प्रवचन करताना डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर, शेजारी सौ.उषा शानभाग, वेदमूर्ती जगदीश भट, रमेश खत्री ,रमेश हलगेकर, अरुण राजहंस व इतर मान्यवर. दुसरीकडे मार्गदर्शन करताना लक्ष्मीकांत पारनेरकर. (छाया : अतुल देशपांडे, सातारा)

सातारा येथील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिर ट्रस्ट आयोजित महाशिवरात्री संगीत व नृत्य महोत्सवात दुसरे पुष्प गुंपताना ..आध्यात्मिक आधी भौतिक आणि आधी दैविक ..या विषयावर विस्तृत प्रवचन सादर करताना बोलत होते .या कार्यक्रमाची सुरुवात लक्ष्मीकांत पारनेरकर, मंदिराच्या महोत्सव समितीच्या संयोजिका सौ.उषा शानभाग ,वेदमूर्ती जगदीश भट ,रमेश हलगेकर, आर. एच. बेलगलकर ,गौरांग शिंदे, अरुण राजहंस आदी मान्यवरांच्या हस्ते देवता पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर वेदमूर्ती श्रीपादशास्त्री जोशी व वेदमूर्ती रामकृष्णशास्त्री जोशी यांनी वेदमंत्राचा जयघोष करत सर्वांना आशीर्वचन केले. गौरांग शिंदे यांनी या कार्यक्रमात प्रस्तावना केली, त्यानंतर स्वागत गीत सौ .गुणकली शिंदे यांनी केले .यानंतर सचिन राजहंस यांनी पारनेरकर महाराजांचा जीवन कला मंडळाच्या वतीने सत्कार केला .आपल्या प्रास्ताविक भाषणात बोलताना संदीप कुलकर्णी म्हणाले की, डॉ.पारनेरकर महाराजांना अर्थशास्त्रातील डॉक्टरेट ही पदवी जिनिव्हा परिषदेतून मिळाली आहे .पूर्णवाद ग्रंथाच्या अमृत महोत्सवात पूर्णवादाचा हा कार्यक्रम नटराज मंदिरात करायला मिळणे हे मोठे भाग्याचे असून याबद्दल मी मंदिराचे विशेष आभार मानतो.

आपल्या प्रवचनात विस्तृत मार्गदर्शन करताना डॉ.लक्ष्मीकांत पारनेरकर म्हणाले की ,निसर्ग, ईश्वर व मानव हा व्यवस्थेचे देवता आहे. व्यवस्थित ही सौंदर्य असते ,हे पूर्णवादामुळे आपल्याला समजले .जीवनात व्यवस्था कशी लावायची हे पूर्ण वादाचा ग्रंथ अभ्यासला वर कळेल. ईश्वराचे अस्तित्व जाणून घेण्यासाठी व त्याची कृपा मिळवण्यासाठी आपण अत्यंत चांगले जगा. आपण अपेक्षा खूप करतो .आज जगातील ९०% भांडणे ही मनातले सांगता येत नसल्यामुळे वाढत आहेत. जगातील वाद हे सुसंवादाने सोडवता येतील, अन्यथा जग हे विनाशाच्या उंबरठ्यावर आहे. आज वैयक्तिक व वैश्विक प्रश्न वाढतच आहेत. भय आणि पैसा यांनी जीवन ग्रासले आहे .तसेच आरोग्याबाबत आहे .तुम्ही उपासना करा तर कृपा होईल. वेद शास्त्रे व उपनिषदांचा अभ्यास करून पारनेरकर महाराजांनी पूर्णवादाचा जगभर प्रसार केला .उपासना मार्गच योग्य असून मनाला येईल तसा परमार्थ करू नका तर अभ्यासाने परमार्थ करा. माणसाला ईश्वरी कृपेची गरज आहे, हेच तो विसरला आहे .इच्छा असेल तर देव समोर उभा राहून आणि स्वप्नातही येऊन मार्ग दाखवेल. यासाठी अंतः करणात तळमळ हवी. आज आपल्या कुटुंब व्यवस्थेवर आणि मातृसंस्थेवर आघात होत आहे. गुरु -शिष्य परंपरा कायम जपा, तरच देशाचे सर्व काही जपले जाईल असे त्यांनी आवर्जून सांगितले.

याप्रसंगी पत्रकार अतुल देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास बेलगलकर, चक्रपाणि शिंदे ,सचिन राजहंस ,रमेश खत्री नितीन शिंदे, नारायण चव्हाण ,नारायणराव,, वासुदेव नायर मंदिराचे व्यवस्थापक चंद्रशेखरन यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते .

१३ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर येथील नर्तन स्कूल ऑफ डान्स ग्रुपच्या गुरु कविता नायर आणि सहकार्यांचा भरतनाट्यम नृत्य कार्यक्रम सादर होणार आहे.

## सीआयडी फेम अभिनेत्याच्या पत्नीचं चोरीला गेलेलं सोन्याचं गंठण शोधण्यात सोलापूर पोलिसांना यश

**सोलापूर :** 'सीआयडी' या लोकप्रिय मालिकेत पोलीस अधिकाऱ्याची भूमिका करणारा अभिनेता अर्पित कपूर याच्या पत्नीचे चोरीला गेलेलं सोन्याचं गंठण सोलापूर पोलिसांनी अवघ्या काही तासात शोधून काढलं आहे.

अर्पित एका लग्नासाठी त्याच्या पत्नीसोबत सोलापूरला गेला होता. त्यावेळी त्याच्या पत्नीचं गंठण चोरीला गेलं होतं.

# राजेश मनोहरराव चौधरी यांना हिंदी कवितेमध्ये 'एक्सलेंस अवार्ड'

**लोणंद : प्रतिनिधी**

इंडियन नेशनल सजेशन स्किम असोसिएशनच्या ३२ वे नेशनल कन्वेंशन २ व ३ फेब्रुवारी २०२३ रोजी नुकतेच दिल्ली येथे संपन्न झाले.

यात भारतातील ऑटो, रिफायनरी,केमिकल, टेक्सटाइल, फर्टिलाइजर, फॉण्ड्री, इ. अनेक कंपन्या सहभागी झाल्या होत्या. इंसान या संस्थेद्वारे अनेक स्पर्धा घेतल्या जातात. यात टाटा मोटर्स पुणे येथे कार्यरत असणारे राजेश मनोहरराव चौधरी यांना हिंदी कवितेमध्ये एक्सलेंस



अवार्ड मिळाला. सुनिल भांबुरे (पावर ट्रेन हेड) व वैभव सावंत (लाइन हेड) यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. राजेश चौधरी यांना इंसानकडून घेतल्या जाणाऱ्या निबंध, घोषवाक्य, चित्रकला, व कविता स्पर्धेत आतापर्यंत १० नेशनल अवार्ड मिळालेले आहे.

याशिवाय टाटा मोटर्स कडून मैन ऑफ द ईयर, जे.आर.डी. क्वालिटी अवार्ड, तसेच साहित्यिक क्षेत्रात अनेक पुरस्कारासह, राज्यस्तरीय साहित्य भूषण पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे टाटा मोटर्स अधिकारी, कर्मचारी, मित्र परिवार, पाहुणे तसेच सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

# तरडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्वरोग निदान शिबीर संपन्न

**लोणंद : प्रतिनिधी**

फलटण तालुक्यातील तरडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात गुरुवार ९ फेब्रुवारी रोजी सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करणेत आले होते. या शिबीराचे उद्घाटन फलटण आमदार दिपक चव्हाण यांच्या हस्ते करणेत आले.

या कार्यक्रमासाठी बालरोग तज्ञ डॉक्टर अनिलराजे निंबाळकर, हृदयरोग तज्ञ डॉक्टर दीपक गोरड, स्त्री रोग तज्ञ डॉक्टर एस. डी. गायकवाड व प्रमुख तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत एकूण ३६८ रुग्णांची तपासणी करण्यात आली .त्यामध्ये स्त्रीरोग रुग्ण १२७, बालरोग रुग्ण ६८, हृदयरोग रुग्ण ३२, अस्थिरोग रुग्ण ५१, सर्वसाधारण ९० रुग्णांची तपासणी करण्यात आली व त्यांना औषध उपचार करण्यात आला. तसेच काही दुर्धर आजाराच्या रुग्णांना



संदर्भ सेवेसाठी पुढे संदर्भित केले.

या कार्यक्रमासाठी सौ. जयश्री चव्हाण सरपंच तरडगांव, सुभाषराव गायकवाड माजी सरपंच तरडगाव, राजेंद्र गायकवाड चेअरमन तरडगाव सोसायटी, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर जगदाळे इतर मान्यवर उपस्थित होते.

'जागरूक पालक सुदृढ बालक' या कार्यक्रमाचा प्रारंभ आमदार दीपक चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील एकूण ८२०९ मुले व मुलींची तपासणी करण्यात येणार असून गंभीर स्वरूपाच्या आजारांना आरोग्य सेवा देण्यात येणार असून दुर्धर आजाराच्या मुलांना संदर्भ सेवा देण्यात येणार आहेत.

'माता सुरक्षीत तर घर सुरक्षीत' या अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये १८ वर्षावरील एकूण १५२०५ मातांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये मधुमेह, रक्तदाब, ॲनेमीया इ.आजारांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आला. तसेच माता सुरक्षित तर घर सुरक्षीत या अभियानाअंतर्गत दुसरा टप्पा दि. २४ जानेवारी २०२३ पासून सुरू झाला असून त्यामध्ये पहिल्या टप्प्यातील निदान झालेले मातांना औषध उपचार पुरविण्यात येणार आहे. डॉक्टर राजेंद्र जगदाळे तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वी करणार असल्याचे डॉक्टर अनिल कदम यांनी सांगितले.

शिबीर यशस्वी करणेसाठी वैद्यकीय अधीकारी, श्री. भोसले, आरोग्य सहाय्यक श्री मोहिते आरोग्य सहाय्यक सर्व कर्मचारी आशा यांनी परिश्रम घेतले.

# के. एस .डी. शानभाग विद्यालयाचा पृथ्वीराज शिंदे राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक विजेता

- शालेय राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड

**सातारा : प्रतिनिधी**

चंद्रपूर येथे सुरू असलेल्या १४ वर्षाखालील शालेय राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत के.एस.डी. शानभाग विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजचा खेळाडू पृथ्वीराज पंकज शिंदे याने सुंदर खेळाचे प्रदर्शन करत अमरावती संघाच्या खेळाडूचे विरोधात फायनलचा सामना जिंकत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले व शालेय राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड झाली .

चंद्रपूर येथे सुरू असलेल्या शालेय राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये पृथ्वीराज पंकज शिंदे याने सुंदर खेळाचे प्रदर्शन करत पुणे विरुद्ध चा सेमी फायनल सामना Win on point निर्णयाने जिंकून फायनल मध्ये प्रवेश केला होता. पृथ्वीराज याला प्रशिक्षक ओम गाढवे यांनी



**पृथ्वीराज पंकज शिंदे याने सुंदर खेळाचे प्रदर्शन करत अमरावती संघाच्या विरोधात फायनलचा सामना जिंकत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.**

सुंदर मार्गदर्शन केले. पृथ्वीराजचे या सुवर्ण यशाबद्दल के.एस.डी.शानभाग विद्यालय आणि जुनियर कॉलेजचे संस्थापक व ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक रमेश शानभाग, संस्थेच्या संचालिका सौ.आंचल घोरपडे मुख्याध्यापिका आणि प्राचार्य सौ .रेखा गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भाग्येश कुलकर्णी तसेच पालक संघाचे अध्यक्ष प्रतिनिधी शिक्षकांनी या यशाबद्दल कौतुक करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# युद्धग्रस्त युक्रेन IMF कडे मागणार कर्ज : सरकारची आर्थिक तूट ३ लाख कोटींच्या पुढे, अमेरिकेच्या मदतीनेही भरपाई अशक्य

**कीव्ह : वृत्तसंस्था**

युद्धग्रस्त युक्रेन देशाची स्थिती सुधारण्यासाठी खचत्र्क्रडे कर्ज मागणार आहे. झेलेन्स्कींनी पाठवलेले अनेक नेते या आठवड्यात पोलंडची राजधानी वॉर्सा येथे खचत्र्क्र्या अधिकाऱ्यांना भेटतील. युक्रेनचे अर्थमंत्री सर्गेई मार्चेन्को यांनी या महिन्याच्या सुरुवातीला युक्रेनची आर्थिक तूट या वर्षी ३ लाख कोटी रुपयांहून अधिक वाढेल, असे सांगितले होते.

अमेरिकेकडून अनुदान म्हणून मिळालेले ८१ हजार कोटी आणि युरोपियन युनियनकडून मिळालेले १ लाख कोटीही याची भरपाई करू शकणार नाहीत. या दोन्ही ठिकाणांहून मदत मिळूनही युक्रेनला ८२ हजार कोटी रुपयांची गरज भासणार आहे.

**युद्ध सुरू होण्याच्या काही आठवड्यांतच युक्रेनला मिळाले होते ११ हजार कोटी**

IMFने देखील सांगितले आहे की,



ते युक्रेनच्या नेत्यांसोबत बैठक घेणार आहेत. मात्र, यापेक्षा अधिक माहिती देण्यास संस्थेच्या अधिकाऱ्यांनी नकार दिला. युद्धाच्या काही आठवड्यांनंतरच खचत्र्क्रे युक्रेनला ११ हजार कोटींचे कर्ज मंजूर केले होते. यासोबतच ऑक्टोबरमध्ये अतिरिक्त १० हजार कोटी देण्यास सांगण्यात आले.

**युक्रेनवर युद्धाचा कसा परिणाम झाला?**

युद्ध सुरू होण्यापूर्वी युक्रेनचे आर्थिक नुकसान ३८ हजार कोटी होते, जे २०२२ मध्ये वाढून २ लाख कोटी झाले. रशियाच्या घुसखोरीमुळे २०२२ मध्ये युक्रेनची अर्थव्यवस्था ३०३% कमी झाली. तर महागाईत २६६ टक्क्यांची उसळी नोंदवली गेली.

**रशियाच्या अर्थव्यवस्थेचे झालेले नुकसान**

रशिया-युक्रेन युद्धाचा परिणाम जगभरातील देशांच्या अर्थव्यवस्थेवर झाला. १४३ लाख कोटींची रशियन अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी पाश्चात्य देशांनी आर्थिक निर्बंध लादले आहेत. फेब्रुवारीपासून अमेरिका, युरोप आणि त्यांच्या मित्र राष्ट्रांनी हजारो रशियन कंपन्या आणि व्यक्तींवर विलक्षण निर्बंध लादले आहेत. रशियाच्या ४६ लाख कोटी रुपये रोख रकमेपैकी निम्मे म्हणजे २३ लाख कोटी रुपये धूळखात पडून आहेत. युद्धाला ६ महिने पूर्ण झाल्यानंतर रशियाच्या अर्थव्यवस्थेत ६ टक्क्यांपर्यंत घसरण होण्याचा अंदाज IMFने वर्तवला होता.

# न्यूझीलंडमध्ये गेब्रिएल चक्रीवादळाचा इशारा

## २५० कि.मी. प्रतितास वेगाने वारे वाहतेय, ४६ हजार घरांमधील वीज गुल

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडमध्ये गेब्रिएल चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. जवळपास ५०९ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. सोमवारी देशाच्या उत्तर भागात २५०घच् वेगाने वारे वाहत आहेत. ऑकलंड शहरात सध्या वाऱ्याचा वेग ताशी ११० घच् आहे. उत्तर भागातील सुमारे ४६ हजार घरांचा वीजपुरवठा ठप्प झाला आहे.

चक्रीवादळामुळे मुसळधार पाऊस पडत आहे. ऑकलंडमध्ये गेल्या २४ तासात ४ इंच पाऊस झाला आहे. येथील समुद्राची पातळी झपाट्याने वाढत आहे. न्यूझीलंडच्या हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, गॅब्रिएल चक्रीवादळ नुकतेच जमिनीवर आले आहे. दरम्यान, वीजवाहिन्या, रस्ते आणि झाडे पडून नुकसान झाले आहे. पुढील २४ तास महत्त्वाचे आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात विध्वंस होण्याची शक्यता आहे. लोकांना घराबाहेर न पडण्याची सूचना देण्यात आली आहे.

ऑकलंडमध्ये जोरदार वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडली आहेत. प्रशासन रस्त्यावरील झाडे हटविण्याच्या कामात गुंतले आहे. लोकांनी खबरदारीचा उपाय म्हणून घरे आणि गोदामांबाहेर वाळूच्या पिशव्या ठेवण्यास सुरुवात केली आहे. वादळ टाळण्यासाठी हा पर्याय वापरला जातो.

**पंतप्रधानांनी मदतीचे पॅकेज केले जाहीर**

न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस हिपकिन्स यांनी या वादळाला धोकादायक असल्याचे म्हटले आहे. त्यांनी मदतीसाठी ६० कोटी ३७ लाख ८३ हजार रुपयांचे मदत पॅकेज जाहीर केले आहे. यासोबतच किनारपट्टीलगतच्या भागात राहणाऱ्या लोकांना सुरक्षित स्थळी जाण्याचे आवाहन केले आहे.

**सरकार इर्मजन्सी लागू करण्याची शक्यता**

आपत्कालीन व्यवस्थापन मंत्री किरन मॅकअनल्टी म्हणाले- पुढील २४ तासांत जोरदार वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. वादळाचा वाढता धोका लक्षात घेता सरकार आणीबाणी लागू करण्याचा विचार करत आहे. न्यूझीलंडच्या इतिहासात वादळामुळे आणीबाणी जाहीर होण्याची ही तिसरी वेळ असेल.

**३० जानेवारीला अतिवृष्टीनंतर पूर आला**

१५ दिवसांपूर्वी म्हणजेच ३० जानेवारी २०२३ रोजी न्यूझीलंडमध्ये जोरदार पाऊस झाला होता. यानंतर पूर आला. रस्ते अडवले गेले, घरे पाण्याखाली गेली. ऑकलंडमध्ये चार जणांचा मृत्यू झाला होता.

# 'पठाण'ची जगभरात ९०० कोटींची कमाई

- शाहरुख खानचा 'पठाण' चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुसाट



**मुंबई : वृत्तसंस्था**

शाहरुख खानचा 'पठाण' चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुसाट धावत आहे. दर आठवड्याला चित्रपट नवनवे विक्रम बनवत आहे. त्याने जगभरात ९०० कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. तिसऱ्याच आठवड्यात त्याने ही कामगिरी केली.

जगभरात त्याने ९०१ कोटींची कमाई केली आहे. चित्रपटाने भारतात ५५८ कोटींची एकूण कमाई केली. नेट बॉक्स ऑफिस कलेक्शन ४६४.८० कोटी, ओव्हरसीज बॉक्स ऑफिस कलेक्शन ३४३ कोटी रुपये आहे.

यशराज फिल्म्सने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून ही माहिती दिली आहे. त्यांनी लिहिले...'चित्रपटाला अपार प्रेम मिळत आहे.' हा यशराज फिल्म्स ॲम्बिशयस स्पाय यूनिव्हर्सचा चौथा चित्रपट आहे.

# स्पाय बलूनवरून अमेरिका-चीन भीडले : बीजिंगने म्हटले - आमचा बलून अमेरिकेत पोहचणे ही किरकोळ बाब, अमेरिकेचे १० बलून चीनमध्ये

**बीजिंग : वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या हद्दीत चिनी बलून पोहचल्याने दोन्ही देशांमध्ये तणाव वाढत आहे. बलून उडत असतानाच अमेरिकेच्या F-२२ फायटर जेटने क्षेपणास्त्र हल्ला करून चिनी स्पाय बलून खाली पाडले. तसेच त्याचा मलबाही चीनला परत करण्यास नकार दिला. आता चीननेही अमेरिकेवर गंभीर आरोप केले आहेत.

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, कोणताही बलून दुसऱ्या देशात जाणे सामान्य बाब आहे. २०२२ पासून १० अमेरिकन बलून चीनमध्ये दाखल झाले आहेत. अमेरिकेत पोहचलेला बलून प्रत्यक्षात नागरी हेतूसाठीचा होता आणि त्याचा हेरगिरीशी काहीही संबंध नाही, असा चीनने म्हटले आहे.

सोमवारी चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेच्या आरोपांना उत्तर दिले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन म्हणाले - अशा गोष्टी घडत राहतात. जर अमेरिका त्याला असाधारण मानत असेल तर अमेरिकेने स्वतःही तेच केले आहे. गेल्या वर्षीपासून आतापर्यंत १० वेळा अमेरिकन फुगे आमच्या देशात घुसले आणि त्यांनी चीन सरकारची मान्यताही घेतली नाही. वांग पुढे म्हणाले की, तुम्हाला याबाबत अधिक माहिती हवी असेल तर हा प्रश्न चीनला नाही तर अमेरिकेला विचारला पाहिजे.

हे अमेरिकेतील मिशिगनमधील हुरो सरोवर आहे. चौथी उडणारी वस्तू इथेच दिसली. सोमवारी पहाटे अमेरिकन हवाई दलाने ते पाडले.

यूएस-कॅनडा सीमेजवळ दिसणारी आणखी एक फ्लाइंग ऑब्जेक्ट दिसून आले होते. रविवारी-सोमवारच्या मध्यरात्री अमेरिकन हवाई दलाने ते पाडले. एका आठवड्यात हे चौथे फ्लाइंग ऑब्जेक्ट दिसले होते. आता त्याचा मलबा शोधला जात आहे. रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी सीमेवर दिसलेल्या उडत्या वस्तूला खाली पाडण्याचे आदेश दिले. यानंतर अमेरिकन फायटर जेटने कारवाई केली.

व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनानुसार, अमेरिकन वेळेनुसार रविवारी दुपारी २:४२ वाजता हवाई दलाच्या F-१६ फायटर जेटने चौथ्या फ्लाइंग ऑब्जेक्टला खाली पाडले. एका अमेरिकन अधिकाऱ्याने सांगितले की, हुरो सरोवरात दिसलेली



चौथी संशयास्पद उडणारी वस्तू वेगळ्या प्रकारची होती. त्यातून काही तारा लोंबकळत होत्या. मात्र, यामुळे लष्कराला कोणताही धोका निर्माण झाला नाही.

ते म्हणाले की, ते जमिनीपासून २० हजार फूट उंच उडत होते. त्यामुळे नागरी उड्डाणासाठी ते धोकादायक ठरू शकते. त्यामुळे व्यावसायिक उड्डाणांना धोका निर्माण झाला होता. ते रहिवासी भागांवर पडण्याचीही शक्यता होती, म्हणून ते खाली पाडण्यात आले. अमेरिकन प्रशासनाने या प्रकरणाशी संबंधित कोणतेही फुटेज जारी केलेले नाही.

**एलियन्सचा सिद्धांत**

अमेरिकन हवाई दलाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, एलियन्सच्या उपस्थितीकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. एलियन किंवा इतर कोणत्याही वस्तूचे अस्तित्व असण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्पाय बलून व्यतिरिक्त दिसलेल्या ३ उडत्या वस्तू कुठून आल्या याचा तपास लष्कर करत आहे. गुप्तचर यंत्रणा तपास करत असून ते कोणत्या निष्कर्षापर्यंत पोहोचतात ते पाहूया.

न्यूयॉर्क टाइम्सशी बोलताना अधिकारी म्हणाले की, आमच्यासमोर दोन प्रश्न आहेत. या उडत्या वस्तू प्रत्यक्षात काय आहेत? आणि अचानक असे काय झाले की ते अमेरिकेत मोठ्या प्रमाणात दिसू लागले आहेत.

यूएस मध्ये २, कॅनडा मध्ये १

दोन तत्सम वस्तू यापूर्वी अमेरिकेत आणि एक कॅनडामध्ये दिसल्या होत्या. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी ते पाडण्याचे आदेश दिले होते. यानंतर अमेरिकन हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी कारवाई करत सर्व वस्तू पाडल्या. चीनमध्येही अशीच एक घटना घडली आहे. तिथेही १२ फेब्रुवारीला किंगदाओ शहराच्या समुद्रावर एक उडणारी वस्तू दिसली.

चीनने भारततही पाठवले होते हेरगिरी बलून

चीनपासून १२ हजार किलोमीटर दूर, जमिनीपासून २४ किलोमीटर उंचीवर असलेल्या अमेरिकेच्या हद्दीत चिनी बलून काय करायले गेले होते? चीनचे म्हणणे आहे की ते हवामानाची माहिती गोळा करत होते. अमेरिकेचे संरक्षण मंत्रालय पेंटागॉनने चीनचा हा दावा फेटाळून लावला आहे. अशा बलूनचा उद्देश हवामानाची माहिती गोळा करणे किंवा केवळ हेरगिरी करणे नसतो, असे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे. अणुहल्ल्यासाठीही चीन काही नवीन पद्धती शोधत असेल असेही असू शकते. अमेरिकेचे संरक्षण तज्ज्ञ एचआय सटन यांच्या मते, जानेवारी २०२२ मध्येही असाच एक बलून भारतावरून उडाला होता.

# प्रभाकरन जिवंत आहे का याचा तपास करू!

## एलटीटीई प्रमुख जिवंत असल्याच्या दाव्यावर श्रीलंका सरकारची प्रतिक्रिया

**कोलंबो : वृत्तसंस्था**

एलटीटीई नेता व्ही. प्रभाकरन जिवंत असल्याच्या दाव्यावर श्रीलंका सरकारने प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रालय या अहवालाची चौकशी करेल, असे श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री अली साबरी यांनी म्हटले. सोमवारी (१३ फेब्रुवारी) तामिळांच्या जागतिक महासंघाचे अध्यक्ष पी नेदुमारन यांनी तामिळनाडूमध्ये एक निवेदन जारी करून प्रभाकरन अजूनही जिवंत आणि बरा असल्याचा दावा केला.

तंजावर येथील मुल्लिवाइक्कल मेमोरिअलमध्ये तामिळ कॉन्फेडरेशनचे प्रमुख पाजा नेदुमारन यांनी पत्रकार परिषदेत प्रभाकरनच्या जिवंत असल्याची माहिती दिली होती. ते म्हणाले की, तामिळ राष्ट्रीय नेता प्रभाकरन जिवंत आहे. तामिळ नेत्याबाबत त्यांनी सांगितले की, ते निरोगी असून ते कुटुंबाच्या संपर्कात आहेत. प्रभाकरन लवकरच बाहेर येईल, असा दावाही त्यांनी केला.

एलटीटीई ही श्रीलंकेतील एक अतिरेकी संघटना आहे. १८ मे २००९ रोजी लिट्टे प्रमुख प्रभाकरनच्या खात्म्यासह श्रीलंकन सरकारने लिट्टेचा नायनाट केल्याची घोषणा केली होती.

एलटीटीई ही श्रीलंकेतील एक अतिरेकी संघटना आहे. १८ मे २००९ रोजी लिट्टे प्रमुख प्रभाकरनच्या खात्म्यासह श्रीलंकन सरकारने लिट्टेचा नायनाट केल्याची घोषणा केली होती.

**श्रीलंकेच्या लष्कराने ठार केल्याचा दावा**

नेदुमार यांनी सांगितले की, त्यांच्या माहितीनंतर एलटीटीई नेत्याबाबत सुरू असलेल्या अफवा थांबतील. त्यांनी इलम तमिळांना (श्रीलंकन तमिळ) प्रभाकरनसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.



२००९ मध्ये, श्रीलंकेच्या सैन्याने एलटीटीईचे वर्चस्व असलेल्या भागात एक मोठी लष्करी कारवाई सुरू केली. यामध्ये लिट्टे प्रमुख मारला गेल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी श्रीलंकेच्या लष्कराने एक छायाचित्रही जारी केले होते. ज्यामध्ये लिट्टे प्रमुखाचा मृतदेह दाखवण्यात आला होता. मात्र, आता या नव्या दाव्यानंतर त्याबाबत प्रश्न निर्माण झाले.

**कुटुंबाकडून माहिती मिळविण्याचा दावा**

नेदुमारन यांनी असेही सांगितले की, ते प्रभाकरनच्या कुटुंबीयांच्या संपर्कात आहेत आणि त्यांनीच एलटीटीई प्रमुख स्वस्थ असल्याची माहिती दिली आहे. एलटीटीईच्या नेत्याच्या संमतीनेच तो आपल्या जगण्याची माहिती देत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, श्रीलंकेत राजपक्षे यांच्याविरोधात सिंहलींनी केलेल्या बंडामुळे आता प्रभाकरन बाहेर पडू शकेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**एलटीटीई प्रमुख प्रभाकरन जिवंत व ठणठणीत**

एलटीटीई प्रमुख वेलुपिल्लई प्रभाकरन जिवंत असल्याचा सनसनाटी दावा तामिळनाडूचे माजी काँग्रेस नेते तथा वर्ल्ड कन्फेडरेशन ऑफ तामिळचे अध्यक्ष पाझा नेदुमारन यांनी केला आहे. ते म्हणाले की, प्रभाकरन जिवंत व ठणठणीत आहे. तो लवकरच जगापुढे येईल. यामुळे त्याच्या मृत्यूविषयी सुरू असणाऱ्या अफवांना पूर्णविराम मिळेल.

# 'काऊ हग डे' वर ममता बॅनर्जींचा टोमणा...

## म्हणाल्या... गायीने शिंग मारल्यास १० लाख, म्हशीला मिठी मारल्यास २० लाखांचा विमा द्या

**कोलकाता : वृत्तसंस्था**

बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी १४ तारखेला म्हणजेच व्हॅलेंटाईन डेला काऊ हग डे साजरा करण्याच्या सरकारच्या आवाहनाचा खरपूस समाचार घेतला. आम्हाला व्हॅलेंटाइन डेच्या दिवशी गायींना मिठी मारण्यास सांगण्यात आले आहे. पण गायीने शिंग मारले तर? हे धाडसी काम करायला माझी हरकत नाही, पण याआधी भाजपने गायीला मिठी मारणाऱ्याला १० लाख रुपये आणि म्हशीला मिठी मारणाऱ्याला २० लाख रुपयांचा विमा द्यावा, असे ममता यांनी सोमवारी बंगाल विधानसभेत म्हणाल्या.

केंद्र सरकारच्या मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या भारतीय पशु कल्याण मंडळाने एक पत्र जारी करून १४ फेब्रुवारी रोजी काऊ हग डे साजरा करण्याचे आवाहन केले. मात्र, दुसऱ्याच दिवशी अपील मागे घेण्यात आले. काँग्रेस नेते जयराम नरेश यांनीही या आवाहनाची खिल्ली उडवत विचारले की, ही कल्पना कुणाची होती? सोशल मीडियावरही यावर बरेच मीम्स बनवले गेले.

सीएम ममता बॅनर्जी यांनी विधानसभेत आपल्या भाषणात सांगितले की, सीमावर्ती भागात निष्पाप लोक मारले जात आहेत. बीएसएफने दहशत पसरवली आहे. केंद्र सरकारने या हत्यांच्या तपासासाठी एक पथकही पाठवले नाही.

# रशियाकडून शस्त्रास्त्र खरेदीत भारत प्रथमस्थानी : ५ वर्षांत १ लाख कोटींची खरेदी

**मॉस्को : वृत्तसंस्था**


रशियाकडून शस्त्रास्त्रे खरेदी करण्यात भारत संपूर्ण जगात पहिल्या क्रमांकावर आहे. रशियाच्या अधिकृत वृत्तसंस्थेने यासंदर्भात नुकताच दावा केला आहे. वृत्तसंस्थेच्या म्हणण्यानुसार, गेल्या ५ वर्षांत रशियाने भारताला सुमारे १३ अब्ज डॉलर्स म्हणजेच १ लाख कोटी रुपयांची शस्त्रे पुरवली आहेत. या काळात भारताने रशियाकडे १० अब्ज डॉलरची शस्त्रास्त्रे मागितली होती.

रशियामध्ये बनवलेल्या शस्त्रास्त्रांपैकी २० टक्के शस्त्रे फक्त भारत खरेदी करत आहे. वृतसंस्थेने असाही दावा केला की, भारत एकटा रशियाकडून २० टक्के शस्त्रे खरेदी करत आहे. युक्रेन युद्धामुळे रशियावर लादण्यात आलेल्या निर्बंधांचाही दोन्ही देशांतील शस्त्रास्त्रांच्या खरेदीवर परिणाम झालेला नाही.

रशियाच्या फेडरल सर्व्हिस फॉर मिलिटरी टेक्निकल कॉर्पोरेशनचे प्रमुख दिमित्री शुगायेव यांनी सांगितले की, भारताव्यतिरिक्त चीन आणि अनेक दक्षिण पूर्व आशियाई देशांनी रशियाकडून शस्त्रास्त्रे खरेदी करण्यात रस कमी केलेला नाही.

**भारत पाश्चिमात्य देशांच्या दबावाखाली आला नाही**

रशियाकडून शस्त्रे खरेदी करू नयेत यासाठी अमेरिका आणि पाश्चात्य देशांनी भारतावर खूप दबाव आणला होता, असेही शुगायेव म्हणाले. मात्र, भारताने या दबावांना



बळी न पडता दोन्ही देशांमधील संबंध कायम ठेवले. रशियाच्या काही निवडक शस्त्रांमध्ये आशियाई देशांना अधिक रस असल्याचेही त्यांनी सांगितले.

रशियाच्या या शस्त्रांत आशियाई देशांचा अधिक रस : एस-४०० ट्रायम्फ क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली, २) शॉर्ट रेंज सरफेस ते एअर मिसाईल सिस्टीम, डॉ- ३० युद्ध विमान, मिग-२९.

**रशियाकडून शस्त्रास्त्र खरेदीप्रकरणी परराष्ट्रमंत्र्यांची भूमीका**

रशियाकडून तेल आणि शस्त्रे खरेदी करू नयेत यासाठी पाश्चात्य देश वेळोवेळी भारतावर दबाव आणत आहेत. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये देशाचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र मंत्री पेनी वोंग यांच्यासोबत पत्रकार परिषद घेत होते. त्यानंतर एका ऑस्ट्रेलियन पत्रकाराने त्यांना शस्त्रास्त्र खरेदीच्या बाबतीत रशियावरील अवलंबित्व कमी करण्याबाबत प्रश्न विचारला. त्यावर परराष्ट्रमंत्र्यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.

ते म्हणाले की, भारत आणि रशियामध्ये अनेक वर्षांपासूनची भागीदारी आहे. त्यामुळे भारताला खूप फायदा झाला आहे. पाश्चिमात्य देश पाकिस्तानसारख्या लष्करी हुकूमशाहीला पाठिंबा देत असताना रशियाने आम्हाला शस्त्रे पुरवली. भारत कोणाच्याही दबावाखाली येणार नसून स्वतःच्या हितासाठी निर्णय घेईल.